प्रेस नोट — दिनांक २७/०५/२०२५

| | |
|---|---|
| लाचलुचपत प्रति. विभाग | घटक - रत्नागिरी युनिट |
| गुन्हा नोंद क्रमांक/ पो. ठाणे | मंडणगड पोलीस ठाणे |
| लोकसेवकाचे नाव व कार्यालय | १) अमित शिगवण, मंडळ अधिकारी म्हाप्रळ<br>२) श्रीनिवास श्रीरामे, ग्राम महसुल अधिकारी सजा म्हाप्रळ अतिरिक्त कार्यभार सोवेली<br>३) मारुती भोसले (शिपाई) उप कोषागार कार्यालय, मंडणगड |
| मागणी केलेली लाच रक्कम | तक्रार देण्यापुर्वी मागणी केलेली लाच रक्कम ५०,०००/- रुपये<br>पडताळणी कारवाई दरम्याने मागणी केली रक्कम ३०,०००/- रुपये (तीस हजार रुपये) |
| स्विकारलेली लाच रक्कम | तक्रार देण्यापुर्वी आरोपीनी स्विकारली लाच रक्कम ४५,०००/- (ऑनलाईन)<br>तक्रार दिलेनंतर स्विकारलेली लाच रक्कम ३०,०००/- रुपये (तीस हजार रुपये ) |
| थोडक्यात हकिगत | तक्रारदार यांनी त्यांचे पत्नीच्या नावे मौजे शेणाळे ता. मंडणगड जि. रत्नागिरी याठिकाणी लिलावामध्ये शेत जमीन खरेदी केली आहे. सदर जमिनीची फेरफार नोंद करुन तसा सातबारा उतारा संबधीत मंडळ अधिकारी व तलाठी यांचेकडुन करुन देतो असे सांगुण सदर कामाकरीता मारुती भोसले यांनी तक्रारदार यांचेकडुन ५०,०००/- रुपये रक्कमेची मागणी तक्रार देण्यापुर्वी केली होती. त्यापैकी ४५,०००/-रुपये मारुती भोसले यांनी ऑनलाईन स्विकारले. परंतु सदरची फेरफार नोंद मंडळ अधिकारी यांनी पुर्ण रक्कम न मिळाल्याने रदद केल्याने आज रोजी तक्रारदार यांनी मंडळ अधिकारी अमित शिवगण, मंडळ अधिकारी म्हाप्रळ, यांची श्रीनिवास श्रीरामे, ग्राम महसुल अधिकारी सजा म्हाप्रळ अतिरिक्त कार्यभार सोवेली व मारुती भोसले शिपाई उप कोषागार कार्यालय, मंडणगड यांचे समक्ष भेट घेतली. तेव्हा सदर फेरफार नोंद मंजुर करण्यासाठी मंडळ अधिकारी अमित शिगवण यांनी तक्ररदार यांचेकडे प्रलंबित काम पुर्ण करुन देण्यासाठी आज दि. २७/०५/२०२५ रोजी पडताळणी दरम्याने ३०,०००/- रुपये लाच रक्कमेची मागणी केली. तक्रारदार यांचेकडुन ३०,०००/- रुपये लाच रक्कम पंचांसमक्ष स्विकारुन. स्विकारलेल्या लाच रक्कमेतील स्वतःचा हिस्सा १५,५००/- स्वतःसाठी ठेवुन उर्वरीत १४,५००/- रुपयांचा हिस्सा तलाठी श्रीनिवास श्रीरामे यांना दिला. म्हणुन तक्रादार यांचेकडुन लाच रक्कम स्विकारणारे मंडळ अधिकारी अमित शिगवण, ग्राम महसुल अधिकारी श्रीनिवास श्रीरामे व मारुती भोसले शिपाई उप कोषागार कार्यालय, मंडणगड यांना पंचासमक्ष ताब्यात घेण्यात आले आहे.<br>सदरची सापळा कारवाई श्री. अविनाश पाटील, पोलीस उप अधीक्षक, श्री.मच्छिंद्र जाधव, पोलीस निरीक्षक, उदय चांदणे सहा. पो.फौजदार ब.नं.११६२, संजय वाघाटे पोलीस हवालदार, विशाल नलावडे पोलीस हवालदार, दिपक आंबेकर पोलीस हवालदार, राजेश गावकर पोलीस कॉन्स्टेबल, हेमंत पवार पोलीस कॉन्स्टेबल, वैशाली धनवडे, पोलीस कॉन्स्टेबल, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग रत्नागिरी यांनी केली आहे. |

| | | |
|---|---|---|
| मार्गदर्शन अधिकारी | १) | मा.श्री.शिवराज पाटील, पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | २) | मा.श्री.संजय गोवीलकर अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | ३) | मा.श्री.सुहास शिंदे, अपर पोलीस अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, ठाणे परिक्षेत्र, ठाणे. |
| | ४) | मा. श्री अविनाश पाटील, पोलीस उप अधीक्षक, ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी घटक |

ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी तर्फे नागरिकांना आवाहन करण्यात येते की, कोणताही शासकिय अधिकारी/कर्मचारी किंवा त्याचे वतीने खाजगी इसम लाचेची मागणी करीत असतील तर कृपया ॲन्टी करप्शन ब्युरो, रत्नागिरी कार्यालयाशी खालील क्रमाकावर संपर्क साधावा.

| | |
|---|---|
| Toll Free No | :- 1064 |
| Telephone No | :- 02352/222893, Mobile No. 7588941247, 9870474535, 7774097874 |
| Office email | :- acbratnagiri@gmail.com |
| Website | :- www.acbmaharastra.gov.in |
| Mobile App | :- www.acbmaharastra.net |
| Facebook Page | :- www.facebook.com/MaharastraACB |

( अविनाश पाटील )
पोलीस उप अधीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, रत्नागिरी